मजकुर :—

दिनांक २५/११/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने Best Detection of the Month माहे ऑक्टोंबर—२०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर—२०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—४, मुंबई. | गु.प्र.श., गु.र.क्र. ८०/२०२१ कलम—३०२ २०१, ३४भा.द.वि., (अॅन्टॉपहिल पो.ठाणे गु.र.क्र.५९२/२१) |

—: “ खुन ”:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्री. संतोष आनंदराव जाधव, वय २७ वर्षे, यांना दि. ३०/०९/२०२१ रोजी सकाळी ०७:३० वा. दरम्यान सहाय्यक पोलीस आयुक्त, सायन विभाग, मुंबई यांचे कार्यालयाचे बाजुला, एक ३० ते ४० वर्षे वयोगटातील पुरूष जातीचा मृतदेह ज्याचे हातपाय तोडलेले, मुंडके नसलेले, अर्धवट जळालेल्या स्थितीत मिळुन आला. त्यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री.संतोष आनंदराव जाधव, वय २७ वर्षे, |
| बळीत इसम | :— | दादा अकुंश जगदाळे, वय ३८ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | शिवशंकर धर्मा गायकवाड, वय ४५ वर्षे, (पोनाचा.०३१५४१/मो.पवि)<br>अटक दिनांक ०९/१०/२०२१ |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात बळीत इसमाचे मुंडके नव्हते तसेच त्यांचे संपुर्ण शरीराचे तुकडे केले असल्याने व अंगावर कोणत्याही प्रकारचे कपडे नसल्याने मयत इसमाची ओळख पटवून गुन्हा उघडकिस आणणे अत्यंत जिकरीचे व कौशल्याचे काम होते. तपासा दरम्यान घटनास्थळी हातावर 'दादा' असे नाव गोंदलेले मृतदेहाचे हाताचा तुकडा हा एरोस्पेस कंपनीचा प्लास्टीकचा सोफा कम एअर बेड व बेडशिटमध्ये गुंडाळलेले तसेच इझी पॅक कंपनीच्या प्लास्टीकच्या पिशव्यांमध्ये मिळुन आला होता. त्यावरून नमुद एरोस्पेस कंपनीचा एअर बेड ऑनलाईन विक्री करणारी कंपनी टेलीब्रान्ड तसेच बेडशीट ऑनलाईन विक्री करणारी कंपनी नापतोल यांचे कार्यालयामार्फत त्यांनी मागील पाच वर्षात ऑनलाईन विक्री केलेल्या एअर बेड व बेडशीटची माहिति प्राप्त करण्यात आली. सदर माहितीचे विश्लेषण करून मुंबई परिसरातील ऑनलाईन खरेदीदारांचे माहिति प्राप्त करून त्यांची प्रत्यक्ष शहानिशा करण्यात आली. परंतु गुन्हा उघडकिस आणण्याच्या दृष्टीने काहीही उपयुक्त माहिति मिळुन आली नाही.

मृतदेहाच्या शवविच्छेदना दरम्यान मयताच्या डाव्या पायांचे ऑपरेशन झालेले असून त्यामध्ये वापरण्यात आलेल्या धातुची इमेज कंपनीची प्लेट बसविण्यात आल्याची माहिति प्राप्त झाली. पायामध्ये मिळालेल्या प्लेटच्या कंपनीमार्फत कंपनीने वितरीत केलेल्या प्लेटबाबत वेगेवगळया सहा राज्यांमध्ये वितरीत केले असल्याची माहिति मिळुन आली. सदर माहितीचे विश्लेषण केले असता, गुन्हा उघडकिस आणण्याच्या दृष्टीने काहीएक माहिति मिळुन आली नाही.

सदर गुन्हयाचे घटनास्थळ पाहता सदरचा गुन्हा हा घटनास्थळाची परिचीत व्यक्तीने केला असावा असा संशय निर्माण झाला होता. त्याअनुषंगाने घटनास्थळावरील डंमडाटा प्राप्त करून त्या आधारे गुन्हयाचा तपास करण्यात आला. त्याचप्रमाणे सि. जी.एस. कॉलनीमधील सिव्हील काम करणारे सर्व ठेकेदार व त्यांचे कामगारांची, तसेच सी.जी.एस.कॉलनीमध्ये राहणारे रहिवाशी यांची माहिति प्राप्त करण्यात आली व त्याबाबत प्रत्यक्ष खात्री करण्यात आली.

नमुद गुन्हयाच्या तपासा दरम्यान घटनास्थळाच्या आजुबाजुच्या परिसरातील तसेच इतर संशयीत ठिकाणांचे ४० ते ५० सी.सी.टी.व्ही.फुटेजची बारकाईने तपासणी करून घटनास्थळी फिरणाच्या संशयीत मोटार वाहनांबाबत माहिति प्राप्त करण्यात आली होती. त्यातील काही अति संशयीत मोटार वाहनांची सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या मध्यमातुन पडताळणी केली असता, एक सिल्वर रंगाची टींटेड ग्लास असलेली व नंबर प्लेटवर चिखल लावलेल्या व्हॅगनार कारवर जास्त संशय आल्याने घटनेच्या रात्री जागे असणाच्या लोकांकडे चौकशी केली असता, नमुद कारमध्ये पोलीस लिहीलेली पाटी होती. व त्यामध्ये एका महिलेसह पोलीस मोटार वाहन चालक गायकवाड हा असल्याची माहिति प्राप्त झाली.

सदर माहितीच्या अनुषंगाने तांत्रिक साधनांद्वारे तपास करीत असताना पोलीस मोटार वाहन चालक गायकवाड याची गाडी घटनास्थळावर आलेली दिसुन आली. त्यानंतर त्याचा सी.डी.आर.व एस.डी.आर. प्राप्त करून त्याचे बारकाईने गुन्हा घडल्याच्या आधीच्या दिवशीच्या कॉलची पाहणी करत असताना, एक कॉल हा 'दादा जगदाळे' नावाच्या इसमाचा असल्याचे आढळुन आले.

त्यावरून संशय बळावल्याने नमुद दादा जगदाळे यांच्या प्राप्त एस.डी.आर.वरून त्यांच्या अकलुज, जि.सोलापुर

या राहते ठिकाणी तात्काळ पोलीस पथक पाठवुन शोध घेत असताना दादा जगदाळे हे दि.२९/०९/२१ रोजी सकाळी मुंबईला गेले असल्याची व ते दि.०८/१०/२१ रोजी पर्यंत परत आले नसल्याचे तसेच त्यांचा मोबाईल फोन सुध्दा बंद असल्याची माहिती त्यांचे नातेवाईकांकडुन प्राप्त झाली. तसेच दादा जगदाळे याचे मुंबईतील गायकवाड नावाच्या पोलीसाच्या बायकोशी प्रेमसंबंध असल्याची माहिती सुध्दा मिळाली. त्यावरून आरोपी विरूध्द संशय जास्त बळावल्याने त्याचा शोध घेत असताना तो मा.सहायक पोलीस आयुक्त, सायन विभाग, मुंबई यांचे सरकारी वाहनावर चालक असल्याचे व तो रजेवर असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्याचे राहते ठिकाणी त्याचा शोध घेतला असता, तो त्याचे राहते घरी मिळुन आला.

पोलीस मोटार वाहन चालक गायकवाड व त्याचे पत्नीला ताब्यात घेवून कक्ष कार्यालयात आणून त्यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये तसेच इतर तांत्रीक तपासाच्या आधारे नमुद आरोपीचा गुन्हयामध्ये सहभाग असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने नमुद आरोपीस नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. अटकेदरम्यान तपासात आरोपीने मयत इसमास त्याचे राहते घरी बोलावून कोयत्याच्या सहाय्याने डोक्यात वार करून जिवे ठार मारले. त्यानंतर बळीताच्या शरीराचे तुकडे करून पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने तसेच पोलीस कोणत्या प्रकारचा व कशा प्रकारे तपास करीत आहेत याची माहिती मिळावी याकरीता सदरचा मृतदेह तो काम करत असलेल्या कार्यालयाचे जवळच त्याचे पत्नीचे मदतीने टाकून पुरावा नष्ट करण्याच्या दृष्टीने जाळण्याचा प्रयत्न केला. असे सांगीतले.

त्यानंतर आरोपीच्या घरातुन मयत इसमाचा मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला असून आरोपीने गुन्हयात वापरलेले हत्यार हे वरळी येथील महानगर पालिकेच्या गटारमध्ये टाकुन दिले होते. ते देखील हस्तगत करण्यात आले आहे. तसेच मा.न्यायसहाय्यक विज्ञान प्रयोगशाळेच्या तज्ञांमार्फत आरोपीच्या राहते घराची तपासणी केली असता, त्याचे घरामध्ये मानवी रक्ताचे डाग आढळुन आले आहेत. सदरचा गुन्हा हा एका पोलीस अंमलदारांने केलेला असून त्याने अत्यंत चतुराईने व मयताची ओळख पटू नये याकरीता शिर गायब करून पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने गुन्हा केला आहे.

अशा प्रकारे कक्ष–०४ येथील तपासी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदरचा गुन्हा हा अत्यंत क्लिष्ट व तपासाच्या दृष्टीने आवाहानात्मक असून देखील त्याचा रात्रंदिवस मेहनत करून अत्यंत कुशलतेने मानवी व तांत्रीक तपास करून नऊ दिवसांत उघडकिस आणला आहे.

गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–४, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | इंद्रजित बाबाजीराव मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | जगदिश छबुराव भांबळ | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | .यशवंत बापुराव शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | बिभीषण लक्ष्मण गव्हाणे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अजय महादेव बिराजदार | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | म.सहाय्यक पोलीस निरीक्षक | .मनिषा सोमनाथ पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | अशोक शिवाजी आंब्रे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | सफौ.२७९५३ | चंद्रकांत चंद्रकांत राऊत | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.२०२४० | संजय गणपत परब | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोह. २८७९० | तुकाराम भास्कर सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.३०५९३ | उत्तम बापुराव बोटे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | मपोह.१०३ | शर्मिला अर्जुन निखाडे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह. ३४२७९ | संदिप निवृत्ती कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पोह.३४४०४ | प्रमोद मारूती मोरे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पोह.९६०००३ | संदिप सुरेश तळेकर | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पोह.९६०६३३ | अजय शंकर बल्लाळ | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पोना.९७१००४/ | ज्ञानेश्वर खंडु मिंडे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.०४००२२ | राजाराम तुकाराम पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पोशि.०७१०६६ | तानाजी रामचंद्र घेरडे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पोशि.०७.१५२१ | अनुपम चंद्रकांत जगताप | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | पो.शि. ०८०२६३ | संजय शामराव गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पोशि.०९.००२२८ | सुशिल दिलीप साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पोशि.०९.०२४२ | श्रध्दानंद सुरेश होटगीकर | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि. ०९१७९३ | प्रविण यशवंत चौरे | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि. ०९२११४ | नानाभाउ मधुकर रोटे | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि. चा. १४०१९१ | किरण केरू चावरेकर | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–७, मुंबई. | गु.प्र.श., गु.र.क्र. ८३/२०२१ कलम ३७९, ४२७, ४११, ३४ भादवि. सह कलम ४,२५ भाहका. सह कलम ३७(१), १३५ मपोका.सह कलम ६६(क),(ड) माहीती तंत्रज्ञान कायदा भा.द.वि. (विक्रोळी पो.ठाणे गु.र.क्र.५८७/२०२१) |

## –: ‘‘ मोटार वाहनांची चोरी व इतर चोरी करणे ’’:–

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :– नमुद गुन्हयात फिर्यादी व साक्षीदार हे दिनांक २२/०८/२०२१ रोजी ०५:४५ ते ०७:३० वाजताचे दरम्यान ठाणे ते मुंबई वाहीणी, सर्विस रोडवर मोटार कार पार्कीग करून मॉर्नीग वॉक करण्यासाठी गेलेले असताना कोणीतरी अज्ञात इसमाने मोटार कारचे बाजुच्या काच फोडुन गाडीतील मोबाईल फोन, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड व रोख रक्कम इत्यादी अंदाजे ३,०४,५००/– रूपयांची चोरी केली. त्यानंतर फियादी व साक्षीदार यांचे चोरी केलेल्या डेबीट कार्ड मधुन मुंबईतील वेगवेगळया एटीएम मधुन एकुण रूपये. ९,५०,०००/– हे काढले होते. अश्याप्रकारे एकुण १२,५४,५००/– रूपयांची चोरी केली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. असिम जसवंत छिबर, वय ४९ वर्षे |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :– | १) २,८७,०००/– रू. अंदाजे किंमत असलेले ८ मोबाइल फोन.<br>२) १७,५००/– रोख रक्कम<br>३) ९,५०,०००/– साक्षीदार यांचे वेगवेगळया एटीएम मधुन काढलेली रक्कम<br>**<u>एकुण १२,५४,५००/–</u>** (अक्षरी– बारा लाख चोपन्न हजार पाचशे रूपये) |
| हस्तगत मालमत्ता | :– | १) महिंद्रा ग्ट्५०० अं.किं.रू. १३,००,०००/–<br>२) इनोव्हा मोटार कार अं.किं.रू. ९,००,०००/–<br>३) होंडा सिटी मोटार कार अं.किं.रू. २,५०,०००/–<br>४) मोबाईल, कॅमेरे, सोन्याची चैन व चांदीचा कडा अं.किं. १,३६,०००/–<br>५) रोख रक्कम रू. ८०,०००/–<br>६) वेगवेळया बॅकांची क्रेडीट/डेबिट कार्ड, चेक्स्, ३० ते ३५ वाहनांचे आर.सी. बुक्स्, महत्वाची कागदपत्रे,शासकिय ओळखपत्रे, मेट्रो कार्ड, इंडीयन रेल्वेचे कार्ड, तलवार, काच फोडण्याची हत्यारे, मारहाण करण्याची हत्यारे, बनावट नंबर प्लेट,मोबाईल सिमकार्ड, मेमरीकार्ड, लॅपटॉप, टॅब्स, आयपॉड, कॅमेरे व लेन्स, ॲपल घडयाळ इत्यादी.<br>**<u>अशी एकूण हस्तगत मालमत्ता अं.किं.रू. २६ लाख ६६ हजार.</u>** |
| आरोपी अटक व दिनांक | :– | **१) मोहम्मद जुनैद उर्फ बंबया यूनुस शेख वय ३२ वर्ष,**<br>**(अटक दिनांक २८/१०/२०२१ रोजी)**<br>२) रईस यासीन खान वय ४५ वर्षे<br>(अटक दिनांक ०२/११/२०२१ रोजी )<br>३) हाफीजा मोहम्मद जुनैद उर्फ बंबया शेख वय ३२ वर्ष,<br>(अटक दिनांक ०३/११/२०२१ रोजी.) |

<u>तपास कौशल्य :–</u> नमूद गुन्हयाचा समांतर तपास कक्ष ७ यांचेकडुन करण्यात येत असताना सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केल्यानंतर MH14DF0639 (MAHINDRAXUV 500) या वाहनातुन आलेल्या अनोळखी इसमाने केल्याचे निष्पन्न झाले. सदर MH14DF0639 (MAHINDRA XUV 500)गाडीच्या मालकाचे नाव व पत्ता प्राप्त करून त्यांचा शोध घेतला असता ते कोंडवा, जिल्हा पुणे येथील मिळुन आला. त्यांचे ताब्यातील मोटार वाहन क्रमांक MH14DF0639 (MAHINDRA XUV 500) हिची पाहणी केली असता गुन्हयात वापरलेली गाडी व मुळ मालकाच्या ताब्यात असलेली गाडीचा रंग व मॉडेल सारखेच आहे. परंतु मुळ गाडीस सनरूफ नाही व गुन्हयात वापरलेल्या गाडीला सनरूफ होते. यावरून आरोपी वापरत असलेली गाडी व मुळ गाडी ही वेगवेगळी असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपीने बनावट वाहन क्रमांक वापरून गुन्हा केल्याने निष्पन्न झाले.

सदर मोटार वाहन क्रमांक MH14DF0639 (MAHINDRA XUV 500) हिचा सीसीटीव्हीच्या आधारे मुंबईमध्ये शोध घेत असता सदरची गाडी दिनांक २६/०८/२०२१ रोजी दहीसर टोल नाका येथुन मुंबई बाहेर जाताना दिसली. म्हणुन सदरची गाडी ही गुजरात कडे गेली आहे का याची खात्री करण्याकरीता मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील खानीवडे टोल नाका, चारोटी टोल नाका, येथील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता त्यामध्ये मोटार वाहन क्रमांक MH14DF0639 (MAHINDRA XUV 500) हि दिनांक ०१/०८/२०२१ रोजी मुंबईकडे येताना, दिनांक ०३/०८/२०२१ रोजी सुरतकडे जाताना तसेच दिनांक २०/०८/२०२१ रोजी मुंबईकडे येताना, दिनांक २९/०८/२०२१ रोजी सुरतकडे जाताना दिसुन आली.

गुन्हयाचा तपास करीत असताना गुन्हयाचे विक्रोळी येथील घटनास्थळ, एटीएम मधुन पैसे काढलेली ठिकाणे

लोअर परेल, हिंदमाता, दादर, आरोपीचे मुंबईतील सीसीटीव्ही मध्ये मिळुन आलेले लोकेशन, व मुंबई ते सुरत हायवेवरील टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसुन येत असलेल्या वेळेतील एकुण १९६४ टॉवर चा टॉवर डम्प डाटा प्राप्त केला. सदरच्या टॉवर डम्प डाटाचे विश्लेषन केले असता कोणताही संशयित मोबाईल क्रमांक मिळुन आला नाही.

गुन्हयाचा तपास करीत असताना मुंबई ते अहमदाबाद रोडवरील खानीवडे टोल नाका, चारोटी टोल नाका, येथील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत असताना मोटार वाहन क्रमांक MH14DF0639 (MAHINDRA XUV 500) हिच्यामधील संशयित आरोपीने त्याच्या शर्टच्या खिश्यामधुन फास्टटॅग काढुन टोलनाक्यावरील फास्टटॅग स्कॅनरसमोर धरल्याचे दिसून आले. तोच धागा पकडुन मोबाईलवरील फास्टटॅगचे ॲप्लीकेशनवर सदर गाडी क्रमांकावर कोणत्या कंपनीचा फास्टटॅग आहे याची माहीती घेतली असता त्याचे सदरचा फास्टटॅग हा Paytm payments Bank चा असल्याचे समजले. त्यावरून टोलनाक्यावरील पेटीएमचे काम करणाऱ्या कामगाराकडुन सदर गाडीचा क्रमांक त्यांचेकडील मोबाईल मधील ॲप्लीकेशन मध्ये सर्च करून बघीतले असता सदर मोटार कारसाठी वापरलेला फास्टटॅग हा Paytm payments Bank चा असुन आय डी क्रमांक ६०५७३४०१ प्राप्त झाला.

सदर पेटीएम फास्टटॅग आय डी क्रमांक ६०५७३४०१ हा पेटीएम च्या नोडल अधिकारी यांना इ—मेल करून सदर आयडी क्रमांकाशी सलग्न असलेली संपुर्ण माहीती मागविली असता पेटीएम कडुन सदरच्या फास्टटॅग आयडीशी सलग्न असलेले नाव मोहम्मद अयाज, मो. क्र. ८६५७७१५४७६ असल्याचे प्राप्त झाले. सदरच्या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर व एसडीआर प्राप्त केला व त्याचे विश्लेषन केले. त्यामध्ये नमुद सिमकार्ड हे चोरी केल्याचे व त्याचा वापर संशयित करीत असल्याचे मिळून आले. सदरच्या मोबाईलच्या सीडीआर वरून आरोपीबाबत खात्रीशीर निष्कर्ष काढता आला नाही. तसेच सदर मोबाईल क्रमांकाचा आयएमईआय क्रमांक मोबाईल कंपन्यांना पाठवुन माहीती मागविली असता काहीही उपयुक्त माहीती प्राप्त झाली नाही.

त्यांनतर पेटीएम च्या नोडल अधिकारी यांना सदरचा पेटीएम फास्टटॅग आय डी क्रमांक ६०५७३४०१ हा पुन्हा ई—मेल करून सदरचे पेटीएम खातेवर पैसे पाठविणाऱ्या किंवा रिचार्ज करणाऱ्या बेंक खात्याची माहीती मागविली असता पेटीएमकडुन ५ पेटीएम आयडी व ५ मोबाईल क्रमांक प्राप्त झाले. सदरचे ५ पेटीएम आयडी पुन्हा पेटीएम च्या नोडल अधिकारी यांना ई—मेल केला व त्याचेबाबत सविस्तर माहीती मागविली. तसेच ५ मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व एसडीआर प्राप्त केले. सदरच्या ५ पेटीएम आयडीची प्राप्त झालेली माहीती व ५ मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व एस डी आर चे विश्लेषन केले असता सदरचे आयडी हे अधिकृत असल्याचे समजले व सदरचे इसम हे टोलनाक्यावर उभे राहुन पेटीएमचे फास्टटॅग आय डी रिचार्ज करण्याचे काम करीत असल्याचे समजले.

तपासाच्या अनुषंगाने पेटीएम च्या नोडल अधिकारी यांना सदरचा पेटीएम फास्टटॅग आय डी क्रमांक ६०५७३४०१ हा पुन्हा ई—मेल करून सदरचे पेटीएम खातेवर पैसे पाठविताना किंवा रिचार्ज करताना इंटरनेटचा वापर केला असल्यास त्याचा IP Log मिळण्याकरीता ई—मेल पाठविण्यात आला. पेटीएमकडुन त्यांचे उत्तरामध्ये दिनांक ०२/०७/२०२१ रोजी १६:१८ वाजता IP &106.213.247.63 हा एयरटेल कंपनीचा आय पी चा वापर झाल्याची माहीती प्राप्त झाली. सदरचा IP &106.213.247.63 हा एयरटेल कंपनीच्या नोडल अधिकारी यांना ई—मेल करून सदरचा आय पी दिनांक ०२/०७/२०२१ रोजी १६:१५ ते १६:२० वाजताचे दरम्यान कोणकोणत्या मोबाईल क्रमांकास दिला असल्याची माहीती मागविली. एअरटेल कंपनीकडुन त्याचेबाबत माहीती प्राप्त झाली असता सदरचा आयपी हा दिनांक ०२/०७/२०२१ रोजी १६:१५ ते १६:२० वाजताचे दरम्यान एकुण १६ मोबाईल क्रमांकास दिल्याची माहीती प्राप्त झाली. सदरचे प्राप्त झालेल्या १६ मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व एसडीआर प्राप्त केले व त्याचे विश्लेषन केले असता सदरचे सर्व मोबाईल क्रमांक हे राज्य — गुजरात सर्कल चे असुन ते गुजरात राज्यामध्ये चालु असल्याचे समजले. त्यानंतर गुन्हयात वापरलेल्या मोटार कारचे मुंबई —अहमदाबाद हायवेवरील खानीवडे टोल नाका व चारोटी टोल नाक्यावर दिसत असलेल्या सीसीटीव्ही प्रमाणे वरील १६ मोबाईल क्रमांकाचे सीडीआर चे विश्लेषन केले असता त्यापैकी एक मोबाईल क्रमांक ९०३३३२२४६८ हा संशयित आरोपीचा असल्याची खात्री झाली.

पेटीएम चे फास्टटॅग रिचार्ज करणारे कामगार यांचेकडुन माहीती प्राप्त झाली कि, त्यांचेकडील मोबाईलमधील ॲप्लीकेशनमध्ये मोटार वाहन क्रमांक नमुद केल्यास सदरचे मोटार वाहन फास्टटॅग वापरून कोणत्याही टोलनाक्यावरून पुढे गेल्यास त्यांना माहीती मिळते. म्हणुन सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना पेटीएम फास्टटॅगचे रिचार्ज करणारे कामगार यांना दररोज दिवसातुन चार ते पाच वेळेस मेसेज किंवा कॉल करून माहीती घेत असताना दिनांक २६/१०/२०२१ रोजी सकाळी ०९:४५ वाजता सदरचे मोटार वाहन क्रमांक MH14DF0639 (MAHINDRAXUV 500) हे फास्टटॅग वापरून मुंबईच्या दिशेने आलेली माहीती प्राप्त झाली. त्यानंतर संशयित आरोपीचा प्राप्त झालेला मोबाईल क्रमांक ९०३३३२२४६८ याचे लोकेशन प्राप्त केले असता ते मुंबईतील मिळाले. तपासी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर संशयित

आरोपीचा अहोरात्र मेहनत घेवुन मोटार वाहन क्रमांक व मोबाईल क्रमांकाचे लोकेशनवरून शोध घेवुन इसम नामे मोहम्मद जुनैद उर्फ बंबया यूनुस शेख वय ३२ वर्ष, धंदा. नाही. रा.ठी. १) सर्वोदय हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ५७८, १३ वा माळा, फ्लॅट नं. १३०१, ५ वा रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५० २) रूम नं. २०३, दुसरा मजला, निले गोदावरी बिल्डिंग, हमली बिल्डिंग जवळ, निले गोरेगांव, नालासोपारा पश्चिम, जि. ठाणे, ३) रूम नं. २०३, आयेशा बिल्डींग, करारी राइज, मिलीनी हॉटेल समोर, नालासोपारा पश्चिम, जि. ठाणे यास दिनांक २८/१०/२०२१ रोजी अटक करण्यात आले.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना आरोपीकडुन गुन्हयातील मालमत्ता विकत घेणारा इसम नामे रईस यासीन खान, वय ४५ वर्षे, यास दिनांक ०२.११.२०२१ रोजी जिल्हा – बेहराईच, राज्य – उत्तरप्रदेश येथुन अटक करण्यात आली. तसेच गुन्हयातील मालमत्तेची विल्हेवाट लावण्यास मदत करणारी क्र ०१ आरोपीची पत्नी नामे हाफीजा मोहम्मद जुनैद उर्फ बंबया शेख, वय ३२ वर्ष, हिस दिनांक ०३.११.२०२१ रोजी अटक करण्यात आली.

**गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपीकडे केलेल्या सखोल तपासामध्ये मोटार वाहन चोरीचे ०८ गुन्हे उघडकिस आलेले आहेत. तसेच १९९ गुन्हे मोटार वाहनाचे काच फोडुन केल्याचे निष्पन्न झाले आहेत.**

१) मुंबई पोलीस आयुक्तालय – १०३ गुन्हे
२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय – ७८ गुन्हे
३) ठाणे पोलीस आयुक्तालय – १५ गुन्हे
४) पुणे पोलीस आयुक्तालय – ०४ गुन्हे
५) पुणे ग्रामीण जिल्हा – ०१ गुन्हा.
५) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय – १ गुन्हे
६) नाशिक पोलीस आयुक्तालय – ०२ गुन्हे
७) रायगड जिल्हा – ०१ गुन्हे
८) पालघर जिल्हा –०२ गुन्हे.

तरी गुप्रशा. गुअवि. कक्ष ०७ मधील नमुद अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार स्वतंत्र तपास पथके तयार करून गुन्हयाची खबर मिळाल्यापासून ते गुन्हा उघडकीस येईपावेतो अखंडीत व अथक तपास करून गुन्हयाचे अनुषंगाने जवळजवळ ५० ते ५५ ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेज ची बारकाईने तपासणी केली. मुंबईतील वेगवेगळया ठिकाणचे व मुंबई ते महाराष्ट्र – गुजरात बॉर्डरवरील चारोटी टोल नाका पर्यंतचे १९६४ मोबाईल टॉवर चा टॉवर डम्प डाटा मिळवून त्याचे सुक्ष्म विश्लेषण करून, टोल नाक्यावर वापरलेल्या फास्टटॅगवरून त्यास लिंक असलेल्या पेटीएम बॅक खात्याचे व्यवहार करण्यासाठी वापरलेले इंटरनेटच्या IP Address वरून यातील आरोपी कोण आहे ते निष्पन्न केले. आरोपीतांचा ठाव ठिकाणा मिळाल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणलेला आहे तसेच इतर २०७ गुन्हे उघडकिस आणलेले आहेत.

गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–७, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. मनीष श्रीधनकर, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्रीमती. प्रिया थोरात, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. सुधीर जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अनिल गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अमोलसिद्ध ओलेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | निलेश चव्हाण, | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | माधवानंद धोत्रे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | अतिश लोहकरे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | रामदास कदम | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | स्वप्नील काळे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | नामदेव प्रभाळकर | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोहक्र. ३१३४७ | दिपक पवार, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोहक्र.३२८०७ | संतोष गुरव, | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | पोहक. ३४१७७ | राजेंद्र शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पोहक. ३४३४४ | प्रदिप बडगुजर, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पोहक.९६०१८३ | सुभाष मोरे, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पोहक.९६०५५२ | शशीकांत कांबळे, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पोनाक. ९७०६५१ | गिरीश जोशी, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पोनाक. ००७४० | विशाल शिंदे, | प्रशस्तीपत्रक |
| २० | पोनाक. ००८२० | विनोद पांडे, | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पोनाक. ०३०४६७ | सचिन गलांडे, | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पोनाक. ०३०८३५ | प्रमोद जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पोनाक. ०६१४८३ | गौरव सोनावणे | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पोशिक. ०८०७७० | दिपक खरे, | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पोशिक.०८०८७२ | विकास होनमाने | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पोशिक. ०९०४६४ | महेश सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पोशिक. ०९०५७२ | जितेंद्र पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पोशिक. ०९२८८२ | गणेश पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २९ | मपोशिक. ११२१५३ | हिना शेख | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पोनाचाक. ००६८८ | राजाराम कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पोशिचाक. १५०८६३ | दिलीपराव राठोड | प्रशस्तीपत्रक |

| ०३ | गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–६, मुंबई. | गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र. ३६/२०२१, कलम ८ (क) सह २० (क),२९ एन.डी.पी.एस.ॲक्ट,<br>(दहिसर पोलीस ठाणे, वि.स्था.गु.र.क्र. २४९/२०२१) |
|---|---|---|

**–: '' अंमली पदार्थाची वाहतूक करणे '':–**

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :– नमुद गुन्हयात दिनांक २४/१०/२०२१ रोजी १७.०० वा. सुमारास गुप्त बातमीदाराकडून माहिति प्राप्त झाली की, दि.२५/१०/२०२१ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वा सुमारास संशयित वाहन हे चरस घेवून मुंबईच्या दिशेने येणार आहे. कक्ष ६ व कक्ष ७ कार्यालयातील पोलीस पथकाने संयुक्त कारवाई दरम्यान दहिसर चेक नाका, दहिसर पोलीस चौकी समोर, याठिकाणी सापळा लावून सेंट्रो मोटार कार ताब्यात घेवून त्यामध्ये पंचासमक्ष झडती घेतली असता, कारच्या दरवाजाच्या पॅनलमध्ये व डिक्की बॅक पॅनलमध्ये पोकळी बनविण्यात आली होती त्यामधून २४ किलो वजनाचे चरस पंचनामा करून पंचासमक्ष हस्तगत करण्यात आले. तसेच नमुद गुन्हयात एकूण ४ आरोपींना अटक करून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. विनोद प्रकाश गायकवाड,३७ वर्षे, |
| हस्तगत मालमत्ता | :– | १) २४ किलो वजनाचा चरस हा अंमली पदार्थ आंतरराष्ट्रीय कि. १४,४०,००,०००/– रू.<br>२) सॅट्रो मो/कार कि.रू.४,००,०००/–<br>३) आरोपींच्या अंगझडतीत रोख रक्कम ४५,१००/रू. व विविध कंपन्याचे एकूण २३,०००/रू. कि. चे मोबाईल फोन<br>**<u>एकूण किमत :– १४,४४,६८,१००/रू.</u>** |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) जासर जहांगिर शेख, वय २४ वर्षे,<br>२) बंडू दगडू उदानशिवे,वय ५२ वर्षे, (मुख्य आरोपी )<br>३) श्रीमती सिंथीया बंडु उदानशिवे, वय २३ वर्षे,<br>४) श्रीमती क्लेरा बंडू उदानशिवे, वय ५२ वर्षे,<br>दिनांक २५/१०/२०२१ रोजी |

<u>तपास कौशल्य :–</u> नमुद गुन्हयात जुन २०२१ मध्ये एका महिला खबरीने खबर दिली की, तिचा एक नातेवाईक ब–याच वर्षा पासुन जम्मु–कश्मीर येथुन चरस आणुन मुंबई मध्ये विक्री करत आहे. अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर खबरीकडे तिच्या नातेवाईकाबाबत माहिति विचारले असता ती वेळ आल्यानंतर माहिती देईन असे सांगत होती. साधरण दोन महिन्यानंतर सुध्दा खबरी नातेवाईकांबाबतीत माहिती देत नसल्याने खात्री झाली की, ती आपल्याला जास्त माहिती देणार नाही

पो.उप.नि रामदास कदम कक्ष–७, यांनी खबरी महिलेचा सी.डी.आर प्राप्त केला व त्या सी.डी.आर.चे विशलेषण करून सदर महिलेच्या संपर्कातील १५ मोबाईल क्रमांकाचे सी.डि.आर प्राप्त करून त्याचे विश्लेषण केले असता सदरचे १५ मोाबईल क्रमांक हे जुन २०21 अगोदर एक–दोन महिन्याच्या अंतराने जम्मु–कश्मीर येथे जावुन परत आल्याचे दिसुन आले. सदर मोाबईल क्रमांकाचे विश्लेषण करत असताना असे समजले की, सदरचे मोबाईल पैकी काही मोबाईल क्रमांक अंधेरी पुर्व, मुंबई व काही मोाबईल क्रमांक पवई हिरानंदाणी परिसरात चालत असल्याचे समजले व सदरचे १५ सिम कार्ड हे वेगवेगळया मोबाईल मध्ये वापरत असल्याने त्यांचा मागोवा काढणे कठिण होत होते

सदरच्या मोबईल क्रमांकांचे विश्लेषण करताना असे लक्षात आले की, ते रस्ते प्रवास करून मुंबई ते जम्मु–कश्मीर परत मुंबई असे प्रवास करत आहेत व ते वापरत असलेले मोबाईल क्रमांक हे जम्मु कश्मिरवरून परत येताना राजस्थान पासून बंद ठेवत आहेत. म्हणुन सदरचे इसम वापरत असलेले मोटार वाहन क्रमांक प्राप्त करणे आवश्यक होते. म्हणुन मोबाईल क्रमांकांचे लोकेशन खाणीवडे टोल नाका पालघर, चारोटी टोलनाका, वापी टोलनाका, सुरत टोलनाका, येथे असलेल्या वेळेचे टोलनाक्यावरील जम्मु कश्मीर येथे जाताना व मुंबई येथे येतानाचे सर्व टोल नाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले व सदरचे सीसीटीव्ही फुटेजची सलग १० दिवस पाहणी करून त्यामध्ये मोबाईलचे टोलनाक्यावरील लोकेशन व मोटार वाहनाचे टोलनाक्यावरील लोकेशनची सांगड घालुन एक मोटार वाहन क्रमांक DL10CS4332 ही सॅन्ट्रो कार ही संशयित वापरत असल्याचे निष्पन्न केले.

सदरची मोटार कार चा क्रमांक DL10CS4332 हा प्राप्त झाल्यानंतर पुन्हा चारोटी टोल नाका व खानीवडे टोल नाका येथे जावुन सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता सदर गाडीतील चालकाने टोल नाकयावर फास्टॅग वापरल्याचे दिसुन आले. त्यानंतर पोउनि रामदास कदम, कक्ष ०७ यांनी फास्टॅग या ॲप्लीकेशन मध्ये सदरच्या मोटार कारचा क्रमांक सर्च केला असता सदरचा फास्टॅग हा पेटीएम चा असुन त्याचा टॅग क्रमांक ८०९४४७१८ असा असल्याचे समजले. म्हणुन पेटीएम कंपनीच्या नोडल अधिकारी यांना सदरचा फास्टॅग क्रमांक ८०९४४७१८ याची सर्व प्रकारची माहीती मिळण्याकरीता ईमेल करण्यात आला. त्यानंतर पेटीएम च्या नोडल अधिकारी यांचेकडुन आलेल्या ईमेलच्या उत्तरामध्ये सदरचे मोटार वाहनास वापरात असलेला फास्टॅग वापरून सदरची मोटार कार DL10CS4332 ही मागील ३ महीन्यामध्ये २ वेळा मुंबई ते कश्मीर व कश्मीर ते मुंबई येथुन आलेली समजले. त्यावेळी खात्री झाली कि, सदरचीच मोटार कार वापरून संशयित इसम हे कश्मीर येथे जावुन चरस घेवुन येत असावेत.

त्यानंतर पोउनि रामदास कदम, कक्ष ०७ हे जवळ जवळ मागील दोन महीन्यापासुन वरील नमुद १५ मोबाईल कमांकाचे लोकेशन तपासत होते. तसेच पेटीएम च्या नोडल अधिकारी यांचेकडुन वर नमुद मोटार कार फास्टॅग वापरून कश्मीर येथे जात आहे का याची माहीती प्राप्त करीत होते. त्यानंतर दिनांक २०/१०/२०२१ रोजी वरील मोबाईल कमांकाचे लोकेशन प्राप्त केले असता ते मुंबईतील असल्याचे समजले. परंतु पेटीएम च्या नोडल अधिकारी यांचेकडुन माहीती प्राप्त झाली कि, दिनांक २०/१०/२०२१ रोजी सदरचे मोटार वाहनास असलेला फास्टॅग वापरून सदरची मोटार कार ही चारोटी टोलनाका पास करून गुजरात च्या दिशेने गेल्याचे समजले. त्यावरून अशी खात्री झाली कि, संशयित आरोपींनी त्यांचेकडील वापरते सर्व मोबाईल कमांक हे मुंबईमध्ये ठेवुन मोटार वाहन घेवुन कश्मीरला गेलेले असावेत. म्हणुन संशयित इसम वापरत असलेले सर्व मोबाईल कमांकाचे IMEI कमांक हे आयएमईआय ट्रेसिंग करीता पाठविले असता त्यामध्ये नवीन ४ मोबाईल कमांक प्राप्त झाले – सदरच्या ४ मोबाईल कमांकाचे वारंवार लोकेशन प्राप्त केले व त्याचप्रमाणे पेटीएम च्या नोडल अधिकारी यांचेकडुन पाहीती प्राप्त केली असता तपास पथकाची खात्री झाली कि, संशयित आरोपींनी वरील मोटार कार वापरून नवीन मोबाईल कमांक वापरत आहे.

दिनांक २०/१०/२०२१ रोजीनंतर दिनांक २५/१०/२०२१ रोजीपर्यंत संशयित आरोपींना ताब्यात घेईपर्यंत कक्ष ०६, कक्ष ०७ मधील अधिकारी व अंमलदार यांनी वर निष्पन्न झालेले ४ मोबाईल कमांक व पेटीएम कडुन वारंवार माहीती प्राप्त करून सदरची मोटार कार ही दहिसर टोल नाका परीसरात आल्यावर तिस शिताफिने ताब्यात घेवुन झडती घेतली असता सदरच्या मोटार कार च्या दरवाज्यामध्ये व मागील डिक्कीमध्ये लपवुन आणलेले चरस मिळुन आले. त्यानंतर सविस्तर पंचनामा करून गुन्हा दाखल करण्यात आला.

## गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–६, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. रविंद्र आत्माराम साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्री. मनीष श्रीधनकर, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. सचिन गोविंद गावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | म.सहा. पोलीस निरीक्षक | श्रीमती. मीरा कल्पेश देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | म.सहा. पोलीस निरीक्षक | श्रीमती अर्चना सुभाष कुदळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री मंगलसिंग मोहन चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अमोलसिद्ध ओलेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोलीस उप निरीक्षक | श्री.सुभाष चिंधु मुठे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोलीस उप निरीक्षक | रामदास कदम | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | निलेश चव्हाण, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | स्वप्नील काळे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | स.पो.उ.नि.क्र. २७५३५ | नितीन बंडू सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १३ | स.पो.उ.नि.क्र. २७५३५ | संजय बबन गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| १४ | स.पो.उ.नि.क्र.२७५३९ | विनय वसंत सकपाळ | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ३१७३४ | उज्वल दत्तात्रय सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पोहक्र.९६०१८३ | सुभाष मोरे, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पोहक्र. ३१३४७ | दिपक पवार, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना.क्र. ९७०५४२ | विजय बबन भिलारे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.क्र. ९८०६९७ | नितीन नामदेव तुपे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र ०४०३६३ | विद्यानंद गोरखनाथ शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र .०४११३२ | विनोद प्रकाश गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ना.क्र ०६१२९४ | राहुल विष्णू आराख | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ना.क्र ०५०७४२ | दीपक सुकलाल मोरे | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पोनाक्र. ०६१४८३ | गौरव सोनावणे | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पोनाक्र. ०३०४६७ | सचिन गलांडे, | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र.०७०४०० | संजय भास्कर भालेराव | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि. ०६–१७०३ | सुरेश ज्ञानू घेरडे | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र. ०८०३३९ | अमोल वसंत इंगळे | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र.०८०२९६ | संभाजी विठ्ठल कोळेकर | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.०११०६४१ | समीर मेहबुब शेख | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.शि.क्र.०७०७७४ | दिगंबर आनंदराव माळवेकर | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | म.पो.शि.क्र. ०८१४२६ | संगीता तुळशिराम अभंग | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पोशिक्र. ०८०७७० | दिपक खरे, | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पोशिक्र. ०९०५७२ | जितेंद्र पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | पो.ना.चा.क्र.९८०७६५ | वसंत कृष्णा डाळे | प्रशस्तीपत्रक |
| ३६ | पो.ना.चा. ००६७४ | गणेश महादेव कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३७ | पोनाचाक्र. ००६८८ | राजाराम कदम | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक २५/११/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ BEST CONVICTION OF THE MONTH " माहे ऑक्टोंबर २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर— २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे, मुंबई. परिमंडळ—२ | गु.र.क्र. ३४०/२०१७, कलम— ३७६,३७७, ५०६ भादवि. |

—: ‘‘ वयोवृध्द महिलेवर जबरी संभोग व अनैर्सिग संभोग ’’:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दि.२५/१०/२०१७ रोजी रात्रौ ०२.०० वा.चे सुमारास, एक वयोवृध्द ६५ वर्षाची महिला जी. व्हि.जैन आणि कंपनी, ५६०/चिराबाजार, जे.एस.एस. रोड, मुंबई येथील फुटपाथवर झोपलेली असताना आरोपी नामे महेशकुमार लखनराम रवाने, वय २७ वर्षे,याने तीचे वयोवृध्दपणाचा गैरफायदा घेवून तीला जबरदस्तीने धमकावून फुटपाथच्या बाजुला पार्क केलेल्या कारच्या आडोश्याला नेवून तीचे इच्छेविरूध्द जबरी संभोग व अनैसर्गिक संभोग केला. नमूद गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती सखुबाई राघव कमवाना वय ६५ वर्षे, |
| बळीत | :— | श्रीमती सखुबाई राघव कमवाना वय ६५ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि.२६/१०/२०२१ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | | महेशकुमार लखनराम रवाने, वय ३० वर्षे,<br>अटक दिनांक २६/१०/२०१७ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) भादवि कलम—३७६ अंतर्गत २५ वर्षे सश्रम कारावास व रू.१५,०००/— दंड, दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावास<br>२) भादवि कलम— ३७७ अंतर्गत १० वर्षे सश्रम कारावास व रू.१०,०००/— दंड, दंड न भरल्यास ४ महिने सश्रम कारावास<br>३) भादवि. कलम—५०६ अंतर्गत २ वर्षे सश्रम कारावास व रू.५,०००/— दंड, दंड न भरल्यास २ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.. |

**तपास कौशल्य** :— मुंबई पोलीसांनी महिला विरोधातील दाखल गुन्हयात एकंदरीत केलेला कौशल्यपूर्ण तपास व मा. न्यायालयात केलेले सादरीकरण यामुळेच नमूद गुन्हयातील आरोपीस २५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. मुंबई पोलीसांच्या सदर कामगिरीमुळे पोलीसांची जनमानसातील प्रतिमा उंचावली आहे.

लो.टी.मार्ग पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. दिपक निकम | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. श्रीकांत राजारामपाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. योगेंद्र पाचे श | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | श्री. संजय मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस निरीक्षक | श्री. ओम वंगाटे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा. पोलीस निरीक्षक | श्री. दत्ताज्य म्हसवेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पोलीस उप निरीक्षक | श्रीमती पल्लवी जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.हवा. क्र. ९३५६ | अनिल राऊत | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९ | पो.हवा.क्र.९६११३६ | राजन हुले | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र. ०४०५६४ | संभाजी चौगुले | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र.०९३३७७ | तातेराव केंद्रे | प्रशस्तीपत्रक |